**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**
प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६४७४२११ विस्तारीत - ३६४२ दूरभाष : २६५८ १५१६
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

## वृत्तपत्र टिप्पणी

## वर्ष २०१४-१५ मध्ये महानिर्मितीच्या वीजदरात कोणतीही वाढ नाही
## आयोगाकडून महानिर्मितीसाठी मंजूर वीजदर प्रति युनिट रु. ३.०७/-

महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने नुकताच दि. ३ मार्च २०१४ रोजी महानिर्मितीच्या आर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ या कालावधीसाठीच्या बहुवार्षिक वीजदर निश्चितीच्या याचिकेवर आदेश दिला आहे.

सदर आदेशानुसार एकूण ११,२३१ मेगावॅट स्थापित क्षमतेच्या वीजनिर्मितीसाठी **महानिर्मितीला दि. १ एप्रिल २०१४ पासून मंजूर केलेला एकूण वीजदर प्रति युनिट रु. ३.०७/- इतकाच असणार आहे. यापूर्वीचा मंजूर वीजदर रु. ३.०६/- प्रति युनिट इतका होता. त्यामुळे एकप्रकारे महानिर्मितीच्या मंजूर वीजदरात आगामी आर्थिक वर्ष २०१४-१५ या कालावधीत कोणतीही वाढ झालेली नाही.**

सदर रु. ३.०७/- प्रति युनिट या मंजूर दरामध्ये स्थिर खर्चापोटी सरासरी रु. १.०२/- प्रति युनिट तर अस्थिर खर्चापोटी प्रति युनिट रु. २.०५/- याप्रमाणे आयोगाकडून मंजुरी देण्यात आलेली आहे. वर्ष २०१४-१५ मध्ये महानिर्मितीला एकूण ५६,३३५ दशलक्ष युनिटस् वीजनिर्मितीचे लक्ष्य देण्यात आलेले असून त्यांपैकी ५२,१२७ दशलक्ष युनिटस् इतकी वीजनिर्मिती औष्णिक व वायु विद्युत यांतून अपेक्षित आहे. उर्वरित ४,२०८ दशलक्ष युनिटस् इतकी वीजनिर्मिती शिखरमागणीच्या कालावधीनुसार जलविद्युत केंद्रातून होणे अपेक्षित आहे.

महानिर्मितीच्या औष्णिक संचांना आयोगाकडून निर्धारित भारांकानुसार वीजनिर्मिती करण्यासाठी पुरेसा कोळसा उपलब्ध होईल हे गृहित धरुन औष्णिक वीजनिर्मितीचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आलेले आहे.

महानिर्मितीच्या औष्णिक संचांसाठी वर्ष २०१४-१५ साठी आयोगाकडून मंजूर वीजदर रु. ३.१७/- प्रति युनिट इतका असून जलविद्युत केंद्रासाठी मंजूर वीजदर रु. १.७१/- प्रति युनिट इतका आहे. तथापि, जलविद्युत केंद्राच्या तुलनेने स्वस्त वीजदराचा फायदा ग्राहकांना देण्यात आलेला असून त्यामुळे आगामी वर्षासाठी महानिर्मितीचा एकत्रित वीजदर हा प्रति युनिट रु. ३.०७/- इतकाच असणार आहे.

**महानिर्मितीचा वीजदर हा अन्य सरकारी वा खाजगी वीजकंपन्यांच्या तुलनेत अशाप्रकारे अत्यंत वाजवी व स्पर्धात्मक आहे हे यावरुन पूर्णत: स्पष्ट होते. अनेकदा काही घटकांकडून महानिर्मितीचा वीजदर महागडा असून तो रु. ५/- ते रु. ६/- प्रति युनिट आहे असा हेतु:पुरस्सर केला जाणारा अपप्रचार किती चुकीचा व खोटा आहे, हेच यावरुन सिध्द होते.**

---

दिनांक : ०५/०३/२०१४.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक / वृत्तवाहिनी

आदरणीय महोदय,
कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत / वाहिनीवर प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.
धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**